जा.क्र. पोआ/२८०१ /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय, दिनांक :-१४.०४.२०२०

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२० चे ००:०१ ते १४/०४/२०२० चे २४:०० वा.च्या जमावबंदी आदेशाचा कालावधी वाढविलेबाबतचा आदेश.**

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात महाराष्ट्रात ,पुणे शहरात गतीने पसरत आहे. असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे **दिनांक ०१/०४/२०२० चे ००:०१ ते १४/०४/२०२० चे २४:०० वा पर्यंत जमावबंदी आदेश अंमलात आहेत.** तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १३/०४/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे दिनांक २५/०३/२०२० रोजीचे लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक ३०/०४/२०२० अखेर वाढविली आहे.

३) भारत सरकार आरोग्य मंत्रालय, तसेच महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केल्याप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, आणि सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींची एकत्र येणे थांबणे किंवा चर्चा करणे, कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणुंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४) त्याअर्थी मी **संदीप बिष्णोई,** पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन ०१/०४/२०२० **चे ००:०१ ते १४/०४/२०२० चे २४:०० वा** दरम्यान लागु केला आहे. सदर आदेशास उपरोक्त महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये सुधारणा करुन मुदतवाढ देवुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक १५/०४/२०२० चे ००:०१ ते ३०/०४/२०२० चे २४:०० वा. पर्यंत जमावबंदी आदेश लागु करीत आहे.**

**अ)** पिंपरी चिंचवड चे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सामाजिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इ. यांना मनाई राहील. (उदा. ऑर्केस्ट्रा, तमाशा, संगीत रजनी)

**ब)** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, शैक्षणिक संस्था, शिकवणी वर्ग, संशोधन, बैठक, मिरवणुक मेळावे, सभा, आंदोलने, पिंपरी चिंचवड दर्शनासारख्या सहली, पर्यटन कंपन्याकडुन आयोजित करण्यात येणा-या देशांतर्गत व परदेशी सहली ई. यांचे आयोजन करण्यासाठी मनाई राहील.

**क)** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात असणा-या दुकाने/सेवा आस्थापना, उपहारगृहे, खादयगृहे, खानावळ, शॉपींग कॉम्प्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब / पब / क्रीडांगणे, मैदाने, लाईव्ह ऑर्केस्ट्रा,जलतरण तलाव, उदयाने, सिनेमागृहे, नाटयगृहे, प्रेक्षागृह, म्युझीयम, व्हिडीओ पार्लर, ऑनलाईन लॉटरी, मंगल कार्यालये, शाळा, माहविदयालये, प्रशिक्षण व संशोधन, खाजगी शिकवणी वर्ग, (महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई, दिनांक २०.०३.२०२० अन्वये) व्यायामशाळा, संग्रहालय, पान ठेले तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे जा.क्रं. एफएलआर-१९२०२०/अधि पुणे दिनांक १३/०४/२०२० अन्वये पुणे जिल्हयातील सर्व एफ.एल.२ (वाईन शॉप), एफ.एल.बी.आर.२, (बियर शॉपी)एफ.एल. ३ (तारांकीत हॉटेल वगळून), फॉर्म ई/ई-२,एफ.एल.४ (कायमस्वरुपी क्लब अनुज्ञप्ती), सी.एल.३.(देशी दारु किरकोळ विक्री),एफ.एल.४ (तात्पुरती) उक्त मद्यविक्री अनुज्ञप्ति) या अनुज्ञप्त्यांचे व्यवहार सुधारित आदेशाव्दारे दिनांक २०/०३/२०२० ते दिनांक ३०.०४.२०२० अखेर पुर्ण दिवस बंद राहतील.

**ड)** संस्थात्मक अलगीकरण आणि विलगीकरण,(Quarantine)मध्ये देखरेखीखाली ठेवणेत आलेल्या तसेच गृह विलगीकरण (Home Quarantine) मध्ये ठेवण्यात आलेल्या नागरीकास ठरवुन दिलेल्या कालावधीदरम्यान किंवा कालावधी पुर्ण होण्यापुर्वी त्या ठिकाणाहून इतरत्र फिरण्यास मनाई राहील.

**इ)** सर्व धर्मियांची धार्मीक स्थळे भावीकांसाठी बंद राहतील. कोणत्याही धार्मिक कार्यक्रमांना परवानगी दिली जाणार नाही.

**ई)** सोसायटीच्या सदस्यांना एकत्रितरित्या जमा होण्यास तसेच सोसायटीमध्ये कोणतेही कार्यक्रम घेण्यास मनाई आहे. तसेच गृह विलगीकरण केलेली व्यक्ती सोसायटीमध्ये वास्तव्यास असल्यास ती स्वतःच्या घरातच राहील याची खात्री करावी. तसेच त्याची जबाबदारी त्या व्यक्तीवर व सोसायटी चेअरमनवर राहील.

**उ)** सर्व नागरिकांना अनावश्यक रित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.

**५) सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत.**

**अ)** जिवनावश्यक मालाची निर्मिती करणारे, औषध व फार्मास्युटिकल निर्मिती करणारे, वैदयकीय उपकरणे निर्मिती करणारे, त्यासाठी लागणारा कच्चा माल व इतर २) उत्पादन प्रक्रिया चालणारे (राज्य सरकारच्या पुर्व परवागनीनुसार) ३) टेलीकम्युनिकेशन्स्, इंटरनेट सेवा, आय टी आणि फक्त आय टी संलग्न सेवा ( अत्यावश्यक सेवेसाठी ) आणि जास्तीत जास्त वर्क फ्रॉर्म होम ४) कोळसा आणि खनिज उत्पादने व त्याची वाहतुक , स्फोटकाचा पुरवठा, खनिज उदयोगाशी आवश्यक बाबी ५) खादय पदार्थ, औषधे, फार्मास्युटिकल आणि वैदयकीय उपकरणांचा पॅकेजींग माल तयार करणा-या कंपन्या ६) तसेच बी - बियाणे,खते, किटकनाशकांचा पॅकेजींग माल तयार करणा-या कंपन्या / आस्थापना ७) मासेमारी, मस्त्यपालन, व्यवसायीक मस्त्यालय, मस्त्यबिज,मस्त्य खादय आणि त्यासंबंधी कामे, उद्योग,खादय आणि देखभाल युनिटस, हॅचरी, फीडप्लॅन्ट ८) शेतकरी व शेतमजुर यांची शेतीतील कामे, कृषी मालाची खरेदी करणा-या संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती व इतर राज्यशासनाच्या निर्देशाने चालणा-या बाजार मंडई.

**ब)** केंद्र सरकारकडील संरक्षण विभाग केंद्रीय निमलष्करी दले, ट्रेझरी (पे ॲन्ड अकाऊंन्ट कार्यालये ) आर्थिक सल्लागार व कॅन्ट्रोलर जनरल ऑफ अकाऊंन्ट यांची क्षेत्रीय कार्यालये तसेच राज्य सरकारकडील पोलीस, होमगार्ड, सिव्हील डिफेन्स, अग्निशमन सेवा व आपत्कालीन सेवा, कारागृहे, खाजगी सुरक्षा सेवा, जिल्हा प्रशासन आणि कोषागारे (कमीत कमी नाममात्र मनुष्यबळासह) नागरिकांच्या उपयुक्ततेच्या (पेट्रोलीयन पदार्थ, ऑईल, एलपीजी, सीएनजी, पीएनजी) पाणी पुरवठा व सॅनिटेशन सेवेशी महापालिका/नगरपालिका, ग्रामपंचायत कडील अत्यावश्यक सेवेशी निगडीत कमीत कमी स्टाफ, वन विभागाकडील झु नर्सरी , वाईल्ड लाईफ, गस्त इत्यादी कामांसाठी लागणारे अत्यावश्यक मनुष्यबळ समाजकल्याण विभागाकडील अनाथालये, बालकाश्रम,बालसुधारगृह, विकलांग व दिव्यांगगृहे , जेष्ठ नागरिक , महिला, विधवा , पेंशनधारक इत्यादींशी संबंधित अत्यावश्यक स्टाफ, विदयुत निर्मिती व पुरवठा, पोस्ट ऑफिस, आपत्कालीन व्यवस्थापन आणि प्राथमिक सुचना देणा-या संस्था, राष्ट्रीय माहिती केंद्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी संबंधित संस्था (कमीत कमी नाममात्र मनुष्यबळासह), बँका, पोस्ट

ऑफीस,एटीएम, इन्शुरन्स कंपन्या, सिक्युरिटी आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडीयाने अधिसुचित केलेल्या भांडवल आणि कर्जबाजार सेवा, रुग्णालये, आरोग्य सेवा, वैदयकीय महाविद्यालये, (अॅलोपॅथी आयुर्वेदीक, होमीओपॅथीक) पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, औषध विक्रीची दुकाने, जनेरिक औषधे, फार्मासुटीकल्स, टेलीकॉम सेवा व इंटरनेट सर्व्हिसेस,शासकीय सेवेसाठी कार्यरत असलेली डाटा आणि कॉल सेंटर, केबल सर्व्हिसेस, ब्रॉडकास्टींग सर्व्हिसेसशी संबंधित आस्थापना

**क)** अंत्यविधी (कमाल २० व्यक्तीपुरता मर्यादित)

**ड )**अत्यावश्यक किराणा सामान, रेशन दुकाने, दुध/दुग्धोत्पादने, कृषी सेवा केंद्र, शेती यंत्राची दुकाने त्यातील सुटे भाग (पुरवठा साखळीसह) व दुरुस्ती दुकाने, पशुखादय, फळे व भाजीपाला, चारा, शीतगृहे आणि कोठारगृहे, जिवनावश्यक वस्तुचा साठा असलेले वेअर हाऊस, जीवनावश्यक वस्तु विक्रीची ठिकाणे, अत्यावश्यक सेवेतील खाजगी सुरक्षा आस्थापना, अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तुची वाहतुक करणारे मोटार ट्रक व त्या वाहतुकीशी संबधीत काम करणारे मनुष्यबळ (पुर्व परवानगीने व त्याबाबत आवश्यक ओळखीचे पुर्व परवानगींचे स्टीकर्स लावुन.)

**इ)** जेथे पर्यटक लॉकडाऊन मुळे अडकुन पडलेले आहेत असे हॉटेल्स्, पेंईग गेस्ट, लॉजेस आणि मोटेल्स्, तसेच वैदयकीय आणि आपत्कालीन सेवेकरिता नेमलेला स्टाफ,विलगीकरण कामकाजासाठी नेमण्यात आलेला स्टाफ.

**ई)** प्रसार माध्यमाचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियत कालिके, मासिके, टी.व्ही.न्युज चॅनल, इ.) कार्यालये चालु राहतील.

**उ)**घरपोच सेवा देणा-या सर्व आस्थापना उदा. अॅमेझॉन, फ्लीपकार्ट, बिग बास्केट, स्वीगी, झोमॅटो, इ.सुरु राहतील.

**ऊ)**तात्कालीन व प्रासंगीक विशेष बाबी लक्षात घेवुन परवानगी घेतलेबाबत महत्वाच्या आस्थापनांना व व्यक्ती समुह यांना लागु राहणार नाही.

**टीप** :-१) वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

२) वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.

**६)** सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती व संस्था भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलीत कायदयांतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहील.

**७)** उपरोक्त ठिकाणी / कार्यक्रम येथील संबंधित संयोजक तसेच आस्थापना मालक/ चालक/ व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक१४.०४.२०२० रोजी दिलेला आहे.**

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

**ठिकाण** :- पिंपरी चिंचवड
**दिनांक** :-१४.०४.२०२०